दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ८४ रविवार दि.०५ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूर जिल्ह्यात १७४ उमेदवारांना शासकीय सेवेत नियुक्ती !
# शासकीय नोकरी ही समाजसेवेची संधी समजून काम करा
## अनुकंपा धोरणातील बदलामुळे नियुक्ती प्रक्रिया गतिमान

लातूर :- जिल्ह्यात १०३ अनुकंपाधारक उमेदवारांना गट-क आणि गट-ड संवर्गात, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे (एमपीएससी) सरळसेवा परीक्षेतून निवड झालेल्या ७१ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. शासकीय सेवेत दाखल झालेल्या या सर्व नवनियुक्त उमेदवारांनी शासकीय नोकरी ही समाजसेवेची संधी समजून काम करावे आणि आपल्या सेवेतून समाज व जिल्ह्याच्या विकासाला प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते अनुकंपा तत्त्वावर गट-क, गट-ड संवर्गातील आणि एमपीएससीद्वारे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाला सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आमदार विक्रम काळे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर महानगरपालिका आयुक्त मानसी आणि अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर यांची प्रमुख उपस्थिती होते. मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या नियुक्ती आदेश प्रदान कार्यक्रमाचे थेट प्रसारण या जिल्हास्तरीय कार्यक्रमात दाखवण्यात आले. लातूर जिल्ह्यात गट-क संवर्गातील ३७ आणि गट-ड संवर्गातील ६६ अशा एकूण १०३ अनुकंपाधारक उमेदवारांना, तसेच एमपीएससीद्वारे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या ७१ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले. यावेळी पालकमंत्री श्री. भोसले, सहकार मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात आदेशांचे वितरण करण्यात आले. राज्य शासनाने अनुकंपा धोरणात केलेल्या बदलांमुळे नियुक्ती प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान झाली आहे. लातूर जिल्ह्यात गेल्या अडीच महिन्यांत प्रशासकीय स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळाली. तसेच, एमपीएससीद्वारे निवड झालेल्या ७१ उमेदवारांना लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आली. यामुळे शेतकरी कुटुंबातील युवक-युवतींना शासकीय सेवेची संधी मिळाली आहे. या सर्व उमेदवारांनी शेतकरी आणि समाजातील गरीब घटकांच्या सेवेसाठी प्रामाणिकपणे काम करावे आणि जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे पालकमंत्री भोसले यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने मार्गी लागली आहे, याबद्दल सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी त्यांचे आभार मानले. आज एकाच दिवशी जिल्ह्यातील १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती मिळाली आहे. यामुळे आपल्या कुटुंबातील सदस्य गमावलेल्या कुटुंबांना आधार मिळणार आहे. तसेच, सरळसेवा भरतीद्वारे नियुक्ती मिळालेल्या ७१ उमेदवारांचे शासकीय नोकरीचे स्वप्न पूर्ण झाले आहे. या सर्व नवनियुक्त अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे सहकार मंत्री यावेळी म्हणाले. शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या सर्व उमेदवारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि सचोटीने पार पाडून समाजाची सेवा करावी, असे आमदार विक्रम काळे यांनी सांगितले. राज्यात प्रथमच एकाच दिवशी इतक्या मोठ्या संख्येने नियुक्त्या देण्यात येत असल्याबद्दल मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानत आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी १७४ उमेदवारांचे अभिनंदन केले. नवीन अनुकंपा धोरणामुळे नियुक्ती प्रक्रिया पारदर्शक आणि गतिमान झाली आहे. अनुकंपाधारक आणि एमपीएससीद्वारे निवड झालेल्या सर्व उमेदवारांनी शासकीय योजनांचा आणि सेवांचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यावेळी म्हणाल्या. प्रारंभी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांनी प्रास्ताविकात अनुकंपा नियुक्ती प्रक्रियेची माहिती दिली. नवीन अनुकंपा धोरणामुळे ही प्रक्रिया गतिमान झाल्याचे त्यांनी नमूद केले.

**गतिमान आणि पारदर्शक प्रक्रियेबद्दल उमेदवारांनी मानले शासन, प्रशासनाचे आभार !**

गेल्या काही वर्षांपासून विविध तांत्रिक आणि प्रशासकीय अनुकंपाधरकांची नियुक्तीची कार्यवाही रखडली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुकंपा नियुक्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना दिल्या. सातत्याने प्रशासकीय बैठकांमध्ये त्याचा आढावा घेतला आणि नवीन अनुकंपा धोरण तयार करण्यात आले. त्यामुळे अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया गतिमान आणि सुलभ झाली. या अंतर्गत जिल्ह्यातील १०३ उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर नियुक्ती देण्यात मिळाली आहे. नियुक्ती आदेश स्वीकारल्यानंतर या उमेदवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्य शासनाचे आणि जिल्हा प्रशासनाचे आभार मानले. यासोबतच एमपीएससीद्वारे घेण्यात आलेल्या पारदर्शक परीक्षेमुळे लिपिक-टंकलेखक पदावर निवड झालेल्या उमेदवारांनीही शासनाचे आभार मानले.

# गद्दार, नमकहरामांना उत्तर देत नाही

मुंबई : प्रतिनिधी

कदमांच्या आरोपामुळे उद्धवसेनेचे नेते आक्रमक झाले आहेत. याच दरम्यान आता बाळासाहेबांच्या पार्थिवावरून रामदास कदम यांनी केलेल्या आरोपावर उद्धव ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे. मी गद्दार आणि नमकहरामांना उत्तर देत नाही. तो माणूस गद्दार आणि नमकहराम आहे. उत्तर देण्याची मला गरज नाही. कारण ठाकरे म्हणजे काय आहे हे अख्खा महाराष्ट्र आणि देश ओळखतो. त्यामुळे गद्दार आणि हरामखोरांना उत्तर देत नाही असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

उद्धवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पार्थिवाचा दोन दिवस छळ केल्याचा आरोप शिंदेसेनेचे नेते रामदास कदम यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत केला. हे खरे की खोटे हे कळण्यासाठी उद्धव यांची नार्को टेस्ट करा, अशी मागणीही त्यांनी केली.

तसेच ज्यांनी माझा पक्ष चोरला, निशाणी चोरली, वडील चोरले त्यांचं कसलं मेरिट आहे. हा अन्याय आहे. निवडणूक आयोगाला कोणत्याही पक्षाचे नाव उचलून दुस-यांना देण्याचा अधिकार नाही.

माझा पक्ष हा शिवसेनाच आहे, शिवसेनाच होता आणि शिवसेनाच राहील. मी निवडणूक आयोगाचे, आयुक्ताचे नाव हे धोंड्या ठेवले होते. आता तो धोंड्या गेला तो कुठे गेला हे माहीत नाही. आता नवीन बोंड्या आला असेल. तो माझ्या पक्षाचे नाव बदलू शकत नाही. कारण माझ्या पक्षाचं नाव हे आजोबांनी आणि वडिलांनी ठेवले आहे. निवडणूक आयुक्त तेव्हा जन्माला पण आले नव्हते असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

शिंदेसेनेच्या मेळाव्यात कदम यांनी बाळासाहेबांच्या मृत्यूविषयी केलेल्या वक्तव्याने राज्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. अशातच त्यांनी पत्रपरिषदेतून जे बोललो त्यावर ठाम असून, ते बदलणार नाही. त्यावेळच्या डॉक्टरांना विचारा.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी प्रयत्नशील - पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**शेतकऱ्यांनी टोकाचे पाऊल न उचलण्याचे आवाहन**

गेल्या दोन ते तीन महिन्यात पूर, अतिवृष्टीमुळे शेतपिकांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यापर्यंत झालेल्या नुकसानीपोटी जिल्ह्यात सुमारे २४४ कोटी रुपये मदत देण्यात आली आहे. सप्टेंबरमधील नुकसानीचे पंचनामे पूर्ण होताच त्याबाबत मदत केली जाईल. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांनी निराश होवू नये, टोकाची पावले उचलू नयेत, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.




लातूर :- जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे नुकसानीचे पंचनामे करताना संवेदनशीलपणे काम करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या. तसेच शासनाने यापूर्वी वितरीत केलेली मदत शेतकऱ्यांया खात्यात जमा करण्याच्या कार्यवाहीला प्राधान्य द्यावे, असेही ते म्हणाले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री श्री. भोसले बोलत होते. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व इतर तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. शेतपिकांच्या नुकसानीसोबतच खरडून गेलेल्या जमिनीचे स्वतंत्र पंचनामे करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. त्यानुसार तातडीने कार्यवाही करून एकही शेतकरी वंचित राहू नये, याची खबरदारी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. ग्रामीण भागातील रस्ते, पुलांचे पुरामुळे मोठे नुकसान झाले आहे. या पुलांच्या व रस्त्यांच्या दुरुस्तीचा प्रस्ताव तातडीने सादर करावा. पाटबंधारे विभागाने बॅरेजसह सर्वच सिंचन प्रकल्पांच्या तातडीच्या दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, असे त्यांनी सांगितले. नदीच्या पुरासोबतच अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या जमिनीचेही पंचनामे करणे आवश्यक असल्याचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले. साठवण तलाव, बॅरेजसह ग्रामीण रस्त्यांच्या दुरुस्ती लवकर होणे गरजेचे आहे, असे आमदार संजय बनसोडे यावेळी म्हणाले. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे, मदत वाटपाची सद्यस्थिती याबाबत माहिती दिली.

# '...म्हणून मोहन भागवत शेगावच्या गजानन महाराजांच्या दर्शनाला जात नाहीत?'

अकोला येथे भारतीय बौद्ध महासभेने आयोजित केलेल्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ड. प्रकाश आंबेडकर यांनी केंद्र सरकार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार हल्लाबोल केला.

मोदींना टाटा बाय बाय करून देशाला वाचवा, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तर सरसंघचालक मोहन भागवत शेगावच्या गजानन महाराजांच्या मंदिरात दर्शनासाठी कधी गेलेत का? असा सवाल करत त्यांनी भागवतांवर देखील निशाणा साधला.

अकोल्यातील कार्यक्रमात बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले, ओबीसींचा घात संघ आणि भाजपने केला आहे. एवढं तरी ओबीसींनी डोक्यात घेतलं तरच ओबीसींचं आरक्षण वाचेल. स्थानिक पातळीवर ओबीसी नेतृत्वाला संधी देणारे आरक्षण आता हातातून जाण्याची शक्यता आहे. शिवाय फक्त राजकीय आरक्षण नव्हे तर शैक्षणिक आरक्षण सुद्धा जाईल.

त्यामुळे ओबीसींनी वेळीच सावध व्हावं, असा इशारा त्यांनी यावेळी ओबीसी समाजाला दिला. तर मोदी विश्वगुरू नव्हे तर चपराशी असल्याची जहरी टीका देखील त्यांनी यावेळी केली. ते म्हणाले, 'ट्रम्प हे मोदींना विश्वगुरू नव्हे तर चपराशी समजत असल्यामुळे त्यांनी अमेरिकेतून भारतीयांना हकलण्याचं धोरण स्वीकारलं आहे.

मोदींना जागतिक पातळीवर किंमत नसल्याने जगातील बहुसंख्य देश पाकिस्तानच्या बाजूने उभे राहत आहेत.' दरम्यान, याच कार्यक्रमातून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत कधी शेगावच्या गजानन महाराजांच्या मंदिरात दर्शनाला गेलेत का?

असा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, 'महिन्यातून एकदा अकोल्यात येणाऱ्या मोहन भागवतांनी अकोल्यापासून ३५ किलोमीटर अतंरावर असणाऱ्या शेगावच्या गजानन महाराजांचं दर्शन का घेतलं नाही? गजानन महाराज सर्वसामान्य ओबीसींच श्रद्धास्थान असल्याने त्यांनी दर्शन घेतलं नाही.'

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन म्हणजे मुक्ती दिन होय - भिक्खू पय्यानंद थेरो

लातूर / प्रतिनिधी :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येवला मुक्कामी १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली. ही धर्मांतर विषमतेच्या विरोधात होते. शोषित, पीडित आणि वंचित समूहाला सन्मानाने जीवन जगण्यासाठी सामाजिक स्वातंत्र्य व समानता आवश्यक होती. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अशोका विजया दशमी दिनी सन १९५६ साली धर्मांतर करून दिक्षा ग्रहण केली. त्यामुळे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा लाखो अनुयायांसाठी खरा मुक्ती दिन असल्याचे प्रतिपादन पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांनी केले आहे.





सार्वजनिक जयंती उत्सव समिती तर्फे ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर या दोन्ही ठिकाणी साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी भंते बोधिराज, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, सर्व सदस्य आणि सर्व अनुयायी सह बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर भिक्खू पय्यानंद थेरो यांनी उपस्थितांना त्रिसरण, पंचशील व बावीस प्रतिज्ञा दिल्या. यावेळी शुभेच्छा पर संदेश देतांना भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले की, धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन हा केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो शोषण व गुलामगिरीविरुद्ध लढ्याचा, माणुसकीची पुनर्स्थापना करणारा खरा मुक्ती दिन आहे, भगवान बुद्धांनी करुणा, प्रज्ञा आणि समत्वाचा मार्ग दाखवला. सम्राट अशोक यांनी बुद्धाच्या शिकवणीवर चालत संपूर्ण जगात अहिंसा आणि मानवतेचा संदेश दिला. त्या परंपरेला पुढे नेत बाबासाहेबांनी बौद्ध धम्माची निवड करून वंचितांना नवजीवन दिले. बुद्ध धम्म म्हणजे स्वातंत्र्याची पहाट आहे असेही ते म्हणाले. या प्रसंगी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे, डॉ. सुधाकर गुळवे, चंद्रकांत चिकटे, मोहन माने, प्रा. अनंत लांडगे, प्राचार्य डॉ. दुश्यंत कटारे, ॲड. अतिश चिकटे, प्रा. देवदत्त सावंत, डॉ. विजय अजनिकर, पांडुरंग अंबुलगेकर, डॉ. अरुण कांबळे, भीमराव चौदंते, ज्योतीराम लामतुरे, राहुल शाक्यमूणी, यशपाल कांबळे, संजय सोनकांबळे, विनोद कोल्हे, विजय चौधरी, विनय जाकते, सत्यप्रकाश कांबळे, ॲड. राजकुमार गंडले, राहुल कांबळे, मिलिंद धावारे, भारतीय बौद्ध महासभेच्या आशाताई चिकटे, सुजाता आजनिकर, सुमन उडानशिव, विद्या ससाणे, विनय जाकते, बाबासाहेब कांबळे, डी. उमाकांत, आकाश सरवदे, राम कोरडे, विजय चौधरी, अमोल शिंदे, चिंटू गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी तसेच समता सैनिक दलाचे प्रमुख साबळे व समता सैनिक दलाचे इतर पदाधिकारी, लक्ष्मण कांबळे, नवनाथ आल्टे, लाला सुरवसे, मयुर बनसोडे, पप्पू सरवदे, प्रविण कांबळे, जितेंद्र बनसोडे, सुमित खंडागळे, रामदास सोनवणे, अशोक कांबळे, कुमार सोनकांबळे, ॲड. रोहित सोमवंशी, डि. एल वाघमारे, प्रा. भिमराव चौदंते, करण गायकवाड, राहुल बनसोडे, माणिक पाडोले, पप्पू कांबळे, रमेश श्रृंगारे, विठ्ठल जाधव, सुरवसे यांच्यासह मोठ्या प्रमाणावर पांढरे वस्त्र परिधान करून प्रतिष्ठीत नागरिक, बौद्ध उपासक व उपासिका उपस्थित होत्या. समाजातील सर्व प्रतिष्ठित मान्यवर, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य, अखिल भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा शाखेचे सर्व पदाधिकारी व सदस्य, समता सैनिक दल लातूर जिल्हा शाखेचे सर्व सैनिक, उपासक उपासिकांची लक्षवेधी उपस्थिती होती.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय

# मेळाव्यांमधील प्रबोधन!

मराठवाडा, विदर्भासह महाराष्ट्रातील अनेक भाग अतिवृष्टीने ग्रस्त आहेत. सामान्य माणसाचे, शेतकर्याचे स्वप्नच त्यात वाहून गेले असताना आणि पूरग्रस्त, शेतकर्यांना मदत पुरवण्यासाठी सरकारची धडपड सुरू असताना दसर्याच्या निमित्ताने राजकीय पक्षांनी मेळाव्यांचे मोहोळ उठवत आपल्या विरोधकांवर टीकेची राळ उठवली. जखमवेरची खपली काढली आणि जोरदार शेरेबाजी करत एकमेकांवर तोंडसुखही घेतले. त्याने कार्यकर्त्यांना काय बळ मिळाले, हा संशोधनाचा विषय असला, तरी सर्वसामान्य जनतेची करमणूक मात्र झाली असावी. मुळात दसरा मेळाव्यात ग्रामीण भागाच्या व शहरांच्या विकासाच्या काय कल्पना आहेत, आपण कोणत्या नव्या कल्पना राबवू इच्छितो, जिल्हा परिषदा, नगरपालिका व महापालिकांचे कामकाज कशाप्रकारे सुधारू इच्छितो, याचे एक व्हिजन नेत्यांनी मांडणे अपेक्षित असते. त्याऐवजी व्यक्तिगत स्वरूपाची टीका आणि चिखलफेक करण्यातच मेळाव्यांचा वेळ वाया जात असेल, तर सामान्य माणसाने बघायचे कोणाकडे?

शिवसेना नेते उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबईतील दसर्या मेळाव्यांनी यावेळी सर्वाधिक लक्ष वेधून घेतले. शिवसेनेची स्थापना १९ जून १९६६ रोजी झाली आणि ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा झाला. त्यावेळी मेळाव्यासाठी दुपारपासून मुंबईतील विविध भागांतील कार्यकर्ते मिरवणुकीने शिवाजी पार्कच्या दिशेने येऊ लागले होते. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'शिवसेनेचा जयजयकार असो' या घोषणांनी तेव्हा आसमंत दुमदुमला होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे या मेळाव्याच्या अग्रभागी होते आणि या संघटनेस आशीर्वाद देण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे स्वतः हजर होते. त्याशिवाय व्यासपीठावर काँग्रेसचे नेते रामराव आदिकही होते. आता यावेळी मुंबईत मुसळधार पाऊस असला, तरी शिवतीर्थावरच मेळावा घेण्यावर उद्धव ठाकरे ठाम होते आणि त्याप्रमाणे त्यांनी पावसात भिजतच सभा घेतली. एवढे असूनही मोठ्या संख्येत शिवसैनिक सभेस उपस्थित राहिले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राज ठाकरे यांच्या मनसेसोबत युतीचे संकेत ठाकरे यांनी दिले. ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर नाव न घेता टीका केली. ओला दुष्काळ जाहीर करा आणि हेक्टरी ५० हजारांची मदत करा, या मागणीवर भाषणाचा भर ठेवला. ही मागणी मान्य न झाल्यास मराठवाड्यासह राज्यभरात आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला. ठाकरे यांनी संपूर्ण भाषणात संघ-भाजपला लक्ष्य केले. मुंबईतील उबाठाची लढाई भाजपशी आहे, शिंदे शिवसेनेशी नाही, असेच संकेत त्यांनी भाषणातून दिले. ठाकरे यांच्या सभेतून विकासाच्या मुद्द्यांची चर्चाच झाली नाही, यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेमके बोट ठेवले. 'दिल्लीपासून गल्लीपर्यंत महायुतीचा भगवा फडकवायचा आहे.

कोणाचे कोणासोबत मनोमिलन होते, याची चिंता तुम्ही बाळगू नका', असे उद्गार एकनाथ शिंदे यांनी गोरेगाव येथील नेस्को मैदानावरील सभेत काढले आणि आगामी निवडणुकांचे रणशिंग फुंकले. मुंबईची सत्ता अन्य कोणाच्या ताब्यात गेल्यास शहर २५ वर्षे मागे जाईल, असा इशाराही शिंदे यांनी यावेळी दिला. मुंबई महापालिकेवर वर्चस्वासाठी दोन्ही शिवसेनेनी मोर्चेबांधणीसाठी या मेळाव्यांचे निमित्त नेमके साधले; मात्र त्यात मुंबईच्या प्रश्नांवर चर्चा किती झाली? निवडणुकांना सामोरे जाताना मुंबईकरांच्या आशा-अपेक्षांची पूर्तता आपण कशी करणार, यावर कोणी आणि कोणते भाष्य केले, याचा शोध घेतलेला बरा! उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठवाड्यातील नुकसान, मदत आणि पाहणी दौर्यावरून उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. त्यांच्या पक्षाच्या आमदार-खासदारांनी पूरग्रस्तांसाठी महिन्याचे वेतन दिले आणि आर्थिक मदत सुपूर्द केली, याची नोंद घ्यावी लागेल.

महाराष्ट्र हे कार्यकर्त्यांचे मोहोळ आहे, असे महात्मा गांधी यांनी म्हटले होते. काँग्रेसची स्थापना मुंबईत ग्रँट रोड येथील गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालयात झाली. भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना १९२५ मध्ये कानपूर येथे झाली असली, तरी त्याच्या संस्थापकांपैकी कॉ. डांगे हे महाराष्ट्रीय नेते होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना डॉ. हेडगेवार यांनी नागपुरात केली. १९५६ मध्ये भारतीय रिपब्लिकन पक्ष स्थापन करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही महाराष्ट्राने भारताला व जगाला दिलेली देणगीच होय. थोडक्यात, राजकारण आणि समाजकारण महाराष्ट्राच्या नसानसांत मुरलेले आहे. महाराष्ट्रात दसर्यानिमित्त विविध मेळावे होतात. संघ तर शताब्दी साजरी करत आहे. त्यांचा विजयादशमीचा सोहळा नागपूर येथील रेशीमबाग मैदानावर माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. शेजारच्या राष्ट्रांत मोठ्या प्रमाणात अशांतता आहे; पण हिंसक उद्रेकांत इच्छित बदल घडून आणण्याची शक्ती नसते.

केवळ लोकशाही मार्गानेच समाजात आमूलाग्र बदल साध्य होऊ शकतो, हे भागवत यांचे आवाहन स्वागतार्ह आहे. पाटोदा तालुक्यातील सावरघाट येथे दसर्या मेळाव्यास संबोधित करताना पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी जातीयवादाचा राक्षस नेस्तनाबूत करा, असे आवाहन केले. मराठा आरक्षणाला आपण कधीच विरोध केला नाही, उलट समर्थनच दिले. त्यामुळे आमच्या लेकरांच्या ताटातले घेऊ नका, असे भावनिक आवाहन त्यांनी केले; मात्र काहीजणांना आरक्षणाच्या आडून ओबीसीतून आरक्षण घ्यायचे आहे, अशी टीकाही त्यांनी केली. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याचा उदो उदो करणारे पोस्टर या मेळाव्यात झळकले, ही गोष्ट खटकण्यासारखीच, तर ओला दुष्काळ जाहीर करा आणि शेतकर्यांना कर्जमुक्त करा, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले. पंकजा व धनंजय मुंडे आणि म्हणून जरांगे यांच्यात या निमित्ताने वाग्युद्धही रंगले. त्यामुळे मराठवाड्यातील वातावरण अधिकच दूषित झाले, हे नाकारता येणार नाही. दसरा मेळाव्याच्या निमित्ताने नेत्यांनी एकमेकांची उणीदुणी काढण्यातच आपली भाषणबाजी खर्ची घातली, असे म्हणावे लागेल.

# पिंजर्यातील चंद्रकला....काळाच्या पडद्याआड

मराठी चित्रपटसृष्टीत मैलाचा दगड ठरलेल्या पिंजरा या गाजलेल्या चित्रपटाची नायिका नृत्यांगणा चंद्रकला ऊर्फ ज्येष्ठ अभिनेत्री संध्या यांनी वयाच्या ९४ वर्षी या जगाचा निरोप घेतला आणि मराठी रसिकांच्या मनावर कधीकाळी अधिराज्य गाजविणारी नायिका काळाच्या पडद्याआड गेली. ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक व्ही.शांताराम बापू यांनी ज्या काही कलाकृती निर्माण केल्या.त्यात पिंजरा या सिनेमाचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.सन १९७२ मध्ये निर्माण झालेला हा सिनेमा आजही मराठी रसिकांच्या मनात कायमचा घर करुन राहिलेला आहे.यामधील कलावंत श्रीधर मास्तर : श्रीराम लागू, चंद्रकला ढवळीकर - अभिनेत्री संध्या यांच्यासह जे मान्यवर कलावंत यामध्ये सहभागी झालेले होते.त्यांनी आपल्या सरस अभिनयाने या कलाकृतीला अजरामर करुन टाकले.आज ५३ वर्ष पूर्ण झाली.या पन्नास वर्षाच्या कालखंडात या सिनेमाचे मराठी प्रेक्षकांवरील गारुड तसूभरही कमी झालेले नाही.उलट आजच्या पिढीलाहा या सिनेमाची भुरळ पडली असल्याचे दिसून येते.इतकी अप्रतिम कलाकृती बापूंनी बनविली. अर्थात यामागे अनेक दिग्गजांचा सहभाग आहे.श्रीराम लागूंचा नायक म्हणून केलेला हा पहिलाच सिनेमा.एक ध्येयवादी शिक्षकाची ही कथा.गावासाठी झटणारा,शिक्षणप्रेमी असे हे श्रीधर मास्तर.गावात तमाशा येऊ नये म्हणून तमाशावाल्यांना हाकलून लावणारा एक समाजसुधारक.पण त्याच समाजसुधारकाला आपल्या सौंदर्य,प्रेमाच्या जाळ्यात ओढणारी नृत्यांगणा चंद्रकला..हे सारी कथाच मनाला शेवटपर्यंत गुंतवूण ठेवणारी आहे. या सिनेमातील राम कदम यांचे अजरामर संगीत,जगदीश खेबूडकर यांच्या गाजलेल्या लावण्या यामुळे या सिनेमाची उंची वाढली.ज्वानीच्या आगीची मशाल हाती, छबीदार छबी मी तोर्यात उभी, तुम्हावर केली मी मर्जी बहाल,नका सोडून जाऊ रंगमहाल, देरे कान्हा चोळी अन लुगडी अशी गाणी प्रचंड अजरामर झाली. या सर्व गाण्यांमध्ये बेभान नृत्य करणारी चंद्रकला अर्थात अभिनेत्री संध्या यांनी जीव ओतून काम केले.त्यामुळे त्या रसिकांच्या मनात कायमच घर करुन राहिल्या. त्यानंतर त्यांनी अनेक मराठी,हिंदी चित्रपटातून काम केले.पण पिंजरामधील संध्याच मराठी प्रेक्षकांच्या मनात कायमची घर करुन



राहिली. चंदनाची चोळी या सिनेमातही संध्या यांची भूमिका खूपच गाजली. संध्या यांचे सर्वच मराठी,हिंदी सिनेमे रसिकांसाठी एक मेजवाणीच ठरलेत.त्यामुळे अजूनही ज्या ज्यावेळी हे सिनेमे विविध चॅनेल्सवर लागतात त्यावेळी अस्सल मराठी रसिक ते पाहण्याचा आनंद लुटतोच. बापूंनी ज्या काही अजरामर कलाकृती निर्माण केल्या.त्यात संध्या यांच्या भूमिका मराठी प्रेक्षकांना निश्चितच पसंत पडल्या. आज त्यांचे निधन झाले.लौकिकार्थाने त्यांनी या जगाचा निरोप घेतला खरा,पण त्यांच्या अजरामर भूमिकांनी त्या रसिकांच्या मनात आजन्म वास करुन राहिल्यात हे नक्की.अभिनेत्री संध्या यांना विनम्र अभिवादन.

***********

अतुल गुळवणी,अलिबाग
९२७०९२५२०१

# तरुणांचे राजकारण आणि राजकारणातील तरुण

हल्ली तरुणांना केंद्रस्थानी ठेवून म्हातारे लोक राजकारण करत आहेत. रोजगार, उद्योग यावर बोलतांना भर दिला जातो परंतू प्रत्यक्षात कोणतेही काम केले जात नाही. खरं पाहिले तर राजकारणाच्या माध्यमातून माणूस व देश समृद्ध केले जायला पाहिजे, विकास व विषेश शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर भर देऊन राजकीय धोरणांची आखणी व्हायला पाहिजे. पण सध्या तसे न होता. शिक्षणावर तर कोणी बोलत नाही, रिक्षा चालवणे, वडापाव विकणे याला रोजगार समजले जाते व त्याची जाहिरात केली जाते. जागतिक पातळीवर भारतीय शिक्षणाचा दर्जा काय? भारतात गुणवत्ता पुर्ण शिक्षण मिळते का? शिक्षणात गुणवत्ता वाढण्यासाठी काय केले पाहिजे? शिक्षीत तरुणांनी वडापाव विकायचे का? शासकीय क्षेत्रातील नोकर भरती का केली जात नाही? लोकसंख्येच्या प्रमाणात शासकीय क्षेत्रात मनुष्य बळ आहे का? यावर कोणीही राजकारण करायला तयार नाही. राजकारण म्हणजे केवळ आपल्या दहा पिढ्यांची कमाई करून ठेवायची आणि देशातील जनतेला भिकेला लाऊन देशाची अधोगती करायची हेच धोरण सर्वच पक्षाचे दिसून येते. आमदार खासदारांच्या पगारात, सुविधेमध्ये वाढ होते तेव्हा कोणीच आवाज उठवत नाही. गप्प राहून सर्व जन स्वतः ची झोळी भरून घेतात. परंतु शिक्षण, रोजगार, आरोग्य यावर बोलायचे तर वेगवेगळ्या प्रकारचे राजकारण करून समिती स्थापन करु, निधी उपलब्ध नाही अशा प्रकारची भाषा वापरून मुख्य विषयांकडे दुर्लक्ष केले जाते. शेतकऱ्यांची जमीन संपूर्ण पाण्याखाली गेली असताना, शेतकऱ्यांकडे दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसताना शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्याची वेळ आल्यानंतर शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त झालेल्या जिवनाचे राजकारण केले जाते तेव्हा राजकीय पक्ष आणि राजकीय नेते सर्वसामान्य लोकांच्या समस्ये विषयी किती गंभीर आहेत हे दिसून येते. देशाचा विचार केला जवळपास पन्नास लाख कोटी रुपयांचे बजेट चालू वर्षाचे आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर जवळपास सात लाख कोटी रुपयांचे बजेट आहे. हा आकडा सर्वसामान्य लोकांच्या कल्पनाशक्ती च्या बाहेरचा आहे. एवढे मोठे बजेट एका वर्षासाठी असताना पैसा नेमका खर्च होतो कुठे? याचा हिशोब खरचं जनतेला मिळतो का? बरं हा सर्वच पैसा जनतेचा आहे हे तरी जनतेला कळते का? याविषयी जनता किती गंभीर आहे? या प्रश्नांची उत्तरे मिळणेच अवघड आहे. रस्ते, पुल, मेट्रो वाढत आहे असे भासवले जात आहे. कारण मोठमोठे रस्ते, पुल, मेट्रो हजारो करोडो रूपये खर्च करून तयार करण्यात आले. परंतु बरेच बांधलेले कामे उद्घाटना अगोदर, उद्घाटन झाल्यावर एक दोन महिन्यांत खराब व्हायला लागले. मग प्रश्न पडतो निकृष्ठ दर्जाचे काम करून हजारो करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला जातो त्या देशात तरुणांचे भविष्य काय असेल याची कल्पना न केलेली बरी. भ्रष्टाचार करून देशाला भिकेला लावणारे राजकारण सुरू असताना तरुणांच्या हिताचे हिताचे राजकारण होणे शक्य नाही. तरुणांनी भ्रष्टाचार, शिक्षण, आरोग्य, रोजगार यावर बोलुच नये. देशाचा शाश्वत विकास व तरुणांचे कल्याण काय असते हे तरुणांना समजूच नये म्हणून राजकारणाच्या माध्यमातून तरुणांच्या डोक्यात जात धर्म बळकट केला जातो. तरुणांना रोजगार, शिक्षण, आरोग्य आपेक्षा धर्म आणि स्वतः ची जात जास्त प्रिय वाटायला पाहिजे अशी वक्तव्य राजकीय नेत्यांकडून केली जातात. मग काय सामाजिक ताणतणाव निर्माण तर होतोच पण ज्याच्या हातात कुटुंबाची जबाबदारी आणि देशाचा कारभार असायला पाहिजे अशी सर्वसामान्य तरुणाच्या हातात दगड धोंडे आणि रहायला तुरुंग मिळतो. जाती धर्मावरून भडकावणारे नेते दंगली नंतर जमानतीही घ्यायला तयार होत नाहीत. जे नेते शेतकऱ्याने गळ्याळा फास घेतला तरी धावून येत नाहीत, औषधोपचार न मिळाल्याने मृत्यू झाला तरी मदतीसाठी समोर येत नाही. अनलिमिटेड डाटा देऊन तरुणांना आभासी दुनियेत ढकलणारे सरकार तरुणांना उदरनिर्वाहासाठी मदत करत नसेल आणि प्रत्येक काम हे कमी पगाराचे, कंत्राटी करून नियमित पगार, सुविधा आणि भविष्य निर्वाह निधी अर्थात पिएफ बंद करून मात्र स्वतःचे पगार वाढ, भरभक्कम पेन्शन, चारशे रूपयात अनलिमिटेड कॉल असताना टेलिफोन साठी प्रतिमहिना दहा रुपये. विमान प्रवास व भवनात अत्यंत स्वस्त पण गुणवत्ता पुर्ण जेवन व्यवस्था.. ज्या सुविधा राजकारणातील लोकांनी जनतेला द्यायला पाहिजे तेच लोक जनतेला लूटून स्वतः उपभोग घेत आहेत. पाण्यामध्ये सर्वकाही वाहून गेल्या नंतर शेतकऱ्यांना थोडेसे अन्न आणि जगण्यासाठी पाच हजार रुपये देणारे नेते मात्र मोबाईल साठी महिना दहा हजार रुपये घेत असतील आणि जनतेला फोन करणे सोडा पण जनतेने केलेला फोन ही उचलत नसतील तर राजकारणी किती इमानदार आणि नितीवान असतील याची खात्री पटते. आज देशातील तरुण हे अज्ञानी व सुस्त होत चालले आहेत. व्यक्ती व देशासमोर संकटाचा डोंगर उभा असताना तरुणांना पद्धतशीर पणे बाजूला सारून समस्येमध्ये आनंद व्यक्त करण्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे. धर्मांध, अज्ञानी व सुस्त तरुण देशाच्या व समाजाच्या प्रगतीसाठी बाधक ठरत असतात. आणि हिच बाधक परिस्थिती राजकारण्यांनी तयार करून ठेवली आहे. देशातील गलिच्छ राजकारणाची प्रतीमा सुधारण्यासाठी, तरुणांच्या उर्जेला गती मिळून तरुणांना रोजगार व विकासाची साधने निर्माण करून देण्यासाठी. मानसाची ओळख जाती धर्मावरून नाही तर माणुस म्हणून कर्माने होण्यासाठी सुशिक्षित आणि जागृत तरुणांनी राजकारणात सक्रिय होणे आवश्यक आहे. जागृत व हक्क अधिकाराची भाषा बोलणारा व्यक्ती कोणत्याही राजकीय पक्षांना नको असतो. राजकीय पक्षांना व नेत्यांना हुजरेगिरी करणारे आणि सतरंज्या उचलणारे मोठेपणासाठी वाटेल ते करणारे तरुण पाहिजे. म्हणजे त्यांचे बॅनर, स्टेज व सभेचे नियोजन फुकटात होते. राजकारणात सत्य व प्रामाणिक मानसाला फारसी किंमत मिळत नाही. उलट खोट बोलुन फसवणाऱ्या आणि पैसे उकळणाऱ्या लोकांवर राजकारणी लोक लवकर विश्वास ठेवतात. परिस्थिती कशीही असली तरीही आता तरुणाईने राजकारणात शिरून राजकारणाचे समीकरण बदलून माणसासाठी व देशासाठी राजकारण करणे अत्यंत आवश्यक आहे. जाती धर्म हे वैयक्तिक बाब असुन ते वैयक्तिक पातळीवरच असायला पाहिजे. तरुणांनी अंधविश्वास, थोतांड, पाखंड याला धर्माशी व जातीशी न जोडता विज्ञानवादी बनुन तर्कशुद्ध व मानवतावादी विचाराची पेरणी करावी जेणेकरून समतेचे रोप तयार होऊन मानवेतेची सावली लोकांना मिळेल. म्हाताऱ्या लोकांनी तरुणांच्या भविष्याचा विचार न करता आता तरुणांनी वयस्कर प्रस्तापित नेत्यांना घरी बसून आराम करू द्यावा. कारण म्हाताऱ्या लोकांकडून काम करून घेणे व तरुणांनी बेरोजगार फिरणे हे ना संस्कारात बसत ना संस्कृती मध्ये बसत. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. तरुणांनी या निवडणुकडे परिवर्तनात्मक बघून सहभागी व्हावे. परंतु राजकारणात आणि चळवळीमध्ये स्वतः ची घरे भरण्याची स्वप्न बघणाऱ्या तरुणांनी राजकारणा पासून दुर रहावे. जो इमानदार आहे. स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी त्याच्या कडे साधन आहे अशाच इमानदार, वैचारिक व जागृत तरुणांची आज राजकारणात गरज आहे. कोणत्याही नेत्यांचे वा संघटनेच्या गुलाम तरुणांनी राजकारणापासून दुर राहून प्रामाणिक लोकांना संधी द्यावी तरच राजकारणाच्या माध्यमातून देशाची व समाजाची प्रगती होईल. आणि खऱ्या अर्थाने तरुण समृद्ध होतील.

***********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# नक्षलवादाचा प्रभाव ओसरतोय...



छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्ह्यात ११ सप्टेंबर रोजी सुरक्षा दलाच्या अभियानाला मोठे यश मिळाले. यात सीसी सदस्य मनोज ऊर्फ बालकृष्णसह दहा कट्टर नक्षलवादी मारले गेले. ही चकमक शोभा आणि मैनपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जंगलात झाली. यात एक कोटी रुपयांचे बक्षीस असलेला तेलंगणमधील वारंगलचा रहिवासी ५८ वर्षीय मोडेम बालकृष्ण याचा मृत्यू झाल्याची बातमी खुद्द पोलिस अधीक्षक निखिल राखेचा यांनी दिली. नक्षलवाद्यांविरोधातील या कारवाईचे महत्त्व ओळखण्यासाठी गेल्या काही महिन्यांतील छत्तीसगड आणि देशभरातील नक्षलवाद्यांविरोधातील मोहिमेचा आढावा घ्यावा लागेल.

मे महिन्यात नारायणपूरअबुझमाड भागात सुमारे ५० तास चालेल्या अभियानात सुरक्षा दलाने दीड कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या आणि नक्षलवाद्यांचा म्होरक्या नंबाला केशव ऊर्फ बसवराजू याला ठार केले. त्याच्या मृत्यूनंतर नक्षलवाद्यांच्या गटांनी सुमारे ६ कोटी रुपयांचे बक्षीस असलेल्या देवजी ऊर्फ संजीव ऊर्फ पल्लवला संघटनेचा नवीन म्होरक्या म्हणून नेमले. त्याचवेळी दंडकारण्य स्पेशल झोनल समितीचे सचिवपद कट्टर नक्षलवादी माडवी हिडमावर सोपविले. तो तेलंगणातील करीमनगर येथे एका सामान्य कुटुंबात जन्मलेला नक्षलवादी असून तो साडेतीन दशकांपासून नक्षल कारवायांत सक्रिय आहे. त्यावर देशभरातील विविध राज्यांनी सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक बक्षीस घोषित केलेले आहे. यानुसार माडवी हिडमा हा बस्तरच्या बिजापूर जिल्ह्यातील पुवर्ती गावातील रहिवासी असून तो नक्षलवाद्यांच्या कारवाया तडीस नेण्यात माहिर समजला जातो.

गेल्या दीड वर्षात छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलाने ४५३ नक्षलवाद्यांना ठार केले आहे. त्याचवेळी १६०२ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. तसेच १६९१ जणांना अटक केली आहे. सरासरी ६ नक्षलवाद्यांना रोज अटक केली जात आहे. गृहमंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशभरात सुरक्षा दलाने २९० नक्षलवाद्यांना ठार केले असून १०९० जणांना अटक केली आणि ८८१ जणांनी शरणागती पत्करली.

२०२५ च्या पहिल्या चार महिन्यांतच १४८ नक्षलवादी ठार झाले आणि १०४ जणांना अटक केली. १६४ जणांनी शरणागती पत्करली. बस्तर विभागात अनेक मोहिमा राबविल्या. त्यात दोन जिल्ह्यांतील मोहिमेत कांकेर जिल्हा (१६ एप्रिल २०२४) आणि विजापूर जिल्हा (९ फेब्रुवारी २०२५) २९ नक्षलवाद्यांना ठार केले. सुरक्षा दलाच्या आक्रमक रणनीतीमुळे नक्षलवाद्यांचे कंबरडे मोडले जात आहे. मागील वर्षात सुरक्षा दलाच्या अभियानात एकूण ३५७ नक्षलवाद्यांना ठार केले अणि त्यात १३६ महिला नक्षलवादी, चार केंद्रीय समितीचे सदस्य अणि १५ राज्य समितीच्या वरिष्ठ सदस्यांचा समावेश होता. दंडकारण्य क्षेत्रातच २८१ नक्षलवादी मारले गेले. छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, आंध्रप्रदेश, ओडिशासारख्या राज्यांत आता नक्षलग्रस्त भागाची व्याप्ती कमी झाली. त्यामुळे नक्षलवाद्यांची संख्या देखील कमी होत आहे. पूर्वी देशात ३८ जिल्हे नक्षलग्रस्त होते अणि ती संख्या आता सहा जिल्ह्यावरच आली आहे.

# प्राचार्य मधुकर गायकवाड यांच्यावतीने कृतज्ञता सोहळयाचे बनसारोळा येथे आयोजन

## –मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली होणार समारंभ

केज/प्रतिनिधी माजी कुलगुरु, प्राचार्य मधुकरराव गायकवाड यांच्यावतीने येत्या रविवारी (दि.पाच ) कृतज्ञता सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव तथा अधिसभा सदस्य डॉ.नरेंद्र काळे यांनी दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी कार्यकारिणी सदस्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु म्हणूनही प्राचार्य गायकवाड यांनी काम केले आहे. त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त येत्या रविवारी महाराष्ट्र विद्यालय, बनसारोळा येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी हा कार्यक्रम होईल. तर राज्याचे सहकारमंत्री मा.ना.बाबासाहेब पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहेत. या कार्यक्रमास पदवीधर आमदार मा.सतीश चव्हाण, शिक्षक आमदार विक्रम काळे यांचीही उपस्थिती राहील. तसेच माजी कुलगुरु डॉ.एन.व्ही. कल्याणकर (गडचिरोली), डॉ. देवानंद शिंदे (कोल्हापूर), डॉ. उध्दव भोसले, डॉ.के.एम.कुलकर्णी



या माजी कुलगुरूसह एनसाई ग्रुपचे संस्थापक बी.बी.ठोंबरे, संचालक ज्ञानेश्वर काळदाते, संस्थाध्यक्ष भागवतराव गोरे यांची उपस्थिती राहील. यावेळी प्रमुख पाहुण्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य मधुकर गायकवाड, बाबासाहेब, निळकंठ व विजय गायकवाड यांची केले आहे.

# बोन्सरी गाव विभागातील कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक ३ /१० / २०२५ रोजी नवी मुंबईतील तुर्भे प्रभाग क्रमांक २० बोनसरी गाव (एमआयडीसी) विभागातील असंख्य तरुणांनी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सर सेनानी : आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून व युवा नेते ऍड. अमन आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन सेनेमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र सचिव : विनोद काळे व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष : वीरेंद्र लगाडे हे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष सौ. रेखाताई इंगळे व जिल्हा सचिव विष्णू वासमणी उपस्थित होते. यावेळी खालील कार्यकर्त्यांनी रिपब्लिक सेनेमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत



प्रवीण साळवे, नितीन वावळे, राहुल खरात, विशाल लोखंडे, प्रमोद लोखंडे, सुरेश साळवे, दीपक इंगळे, अनिल साळवे, अनिल लहाने इत्यादी कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश केल्याबद्दल रिपब्लिकन सेनेचे सर सेनानी आनंदराज आंबेडकर यांनी सर्वांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील कार्यास मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# बाबासाहेब बिक्कड (सावकार)यांच्या अपघाती निधनाने नाव्होली गावावर शोककळा ; गावात शिमोलंघन झालेच नाही

### घटनेच्या अगोदर काय घडले

नाव्होली येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक बिक्कड आणि दैनिक लोकनायकचे केज तालुका प्रतिनिधी पत्रकार महादेव काळे हे दोघे मित्र दि. २ ऑक्टोबर गुरुवार रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास केजहुन आपल्या गावी नाव्होली या ठिकाणी आपापल्या दुचाकीवरुन येत असताना गावाजवळील खंडोबा मंदिराजवळ असणाऱ्या पोपट बिक्कड यांच्या घरासमोर सुभाष बिक्कड यांची म्हैस अचानक आडवी पळल्याने दोघांच्या गाड्यांना जोराची धडक बसल्याने या गाड्या खाली पडल्या याच वेळी बाबासाहेब बिक्कड गावाकडून घरी जात होते. ते त्या ठिकाणी थांबून विचारपूस करुन दहा मिनिटे बोलुन आपल्या घराकडे गेले मात्र वाटेतच पोल रोखण्याच्या कामाजवळ थांबल्याने त्यांच्यावर हा मृत्यू ओढवला. अपघातानंतर अवघ्या अर्ध्या तासात ही घटना घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

केज/प्रतिनिधी गरीब असो की,श्रीमंत आणि ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू हा अटळ आहे.हे निसर्गाने दिलेला नियम असुन तो सर्वांना पाळणे ही पाळणे आहे. फक्त मृत्यूची वेळ ठिकाण आणि कारण कोणाला माहीत नाही. काल देखील अशीच घटना नाव्होली गावात घडली असुन ठणठणीत प्रकृती असलेले आणि चालत बोलत या गावातील सर्वोपरीचीत शेतकरी बाबासाहेब बिक्कड (सावकार) यांच्या अंगावर लाईटचा लोखंडी पोल पडून त्यांचा उपचारा दरम्यान दुर्दैवी अपघाती मृत्यू झाल्याने गावावर शोककळा पसरली असुन त्यांच्या निधनाने नाव्होली गावात आणि परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील नाव्होली येथील व्यवसायाने शेतकरी असणारे बाबासाहेब दादाराव बिक्कड वय अंदाजे ५५ वर्ष हे दि. २ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी दसरा सणा दिवशी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास गावातुन नांदूर केज रस्त्याने आपल्या घरी येत होते. त्याच दिवशी सकाळपासूनच गावापासून ते बाबासाहेब दादाराव बिक्कड हे राहातं असलेल्या येडझनी वस्ती पर्यंत महावितरण कंपनीचे राजेगाव सबस्टेशन अंतर्गत गावठाण शिंगलफेज लाईटचे लोखंडी पोल रोखण्याचे काम गुत्तेदारामार्फत सुरू होते. सायंकाळी अंदाजे ५:०० वाजणेच्या सुमारास बाबासाहेब बिक्कड हे गावाकडून येडझनी वस्ती असलेल्या आपल्या घराकडे येत होते. मात्र वाटेतच पोल रोवत असलेले पाहून रोडवर त्यांनी आपल्या शेतातुन काढून आणलेल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्याजवळ काही वेळ ऊभे राहिले.असताना त्या ठिकाणी रोवण्यासाठी आणलेला लोखंडी पोल रोडच्या या बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे नेत असताना ट्रॅक्टरला लोखंडी साखळीने लटकलेल्या पोलची साखळी तुटली आणि वर लटकलेला लोखंडी पोल रस्त्याच्या कडेला आपल्या सोयाबीनच्या ढिगाऱ्याजवळ उभे असलेले बाबासाहेब दादाराव बिक्कड यांच्या डोक्यात पडला त्यात त्यांच्या डोक्याला पायाला गंभीर मार लागल्याने त्यांना अंबाजोगाई येथील स्वा.रा.ति.या ठिकाणी उपचारासाठी दाखल केले असता उपचार सुरू असताना त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. हि घटना सांयकाळी घडल्याने आणि त्यादिवशी दसरा सण असल्याने शिमोलंघनाच्या तयारीत असणारे सारे गाव मृत्यूची माहिती मिळताच स्तब्ध झाले. त्यामुळे गावात शिमोलंघन झालेच नाही. रात्रीची वेळ असल्याने त्यांचे शवविच्छेदन दुसऱ्या दिवशी सकाळी झाल्याने त्यांच्या पार्थिवावर दि.३ ऑक्टोबर शुक्रवार रोजी दुपारी १:०० वाजता त्यांच्या शेतात हाजारोच्या उपस्थित अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील सर्व ग्रामस्थ आप्तेष्ट, मित्रपरिवार,



सामाजिक,राजकीय, धार्मिक क्षेत्रातील चाहते अंत्यविधी साठी उपस्थित होते. बाबासाहेब बिक्कड यांना सावकार या नावाने सर्वत्र ओळखले जात होते. त्यांचा चाहता वर्ग मोठा होता. तसेच त्यांना धार्मिक सांप्रदायिक कार्याची खुप आवड होती. या त्यांच्या जाण्याने नाव्होली गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी चंद्रकला, दोन मुले बालाजी आणि प्रदिप तर मुलगी सुरेखा (विवाहित) जावाई,सुना, नातवंडे असा मोठा परिवार असुन त्यांचा रक्षा सावरण्याचा कार्यक्रम दि.४ ऑक्टोबर शणिवार रोजी सकाळी ७:३० वाजता ठेवण्यात आला आहे.

# धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा - संघमित्रा महिला मंडळाची प्रेरणादायी परंपरा

दादर :– धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा – संघमित्रा महिला मंडळाची प्रेरणादायी परंपरा बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ रोजी गतीमान केलेला ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन तथा महान चक्रवर्ती राजा सम्राट अशोका विजयादशमी दिन बौद्धजन पंचायत समिती शा. क्र. ५७९ अंतर्गत संघमित्रा महिला मंडळ यांच्या वतीने गुरुवार दि. ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी ज्योतिबा रहिवाशी संघ, महात्मा फुले रोड, नायगाव, दादर (पु.) मुंबई – १४. येथे शाखा अध्यक्ष आयु. राहुल गजानन अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. सकाळी संघमित्रा महिला मंडळ च्या अध्यक्षा आयुनी. दामिनी दिपक तांबे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन केल,तर महिला मंडळ यांनी सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली, प्रसंगी आरती प्रतीष्ठान च्या वतीने समोसे व आयु. सचिन शरद कांबळे यांनी लाडू वाटप केले. सायं. कु.कनिष्क अहिरे – पिंपळाच्या पानावर, कु.कनिष्का अहिरे – दाराकडे वळली तुझ्या गौतमाची पाऊले, आयुनी. प्रविणा साळवी, आयु. राहुल अहिरे, आयुनी. ज्योती तांबे, आयुनी. अविका तांबे यांनी गिते गाऊन उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर उपस्थित संघमित्रा महिला मंडळ च्या अध्यक्षा आयुनी दामिनी तांबे, खजिनदार आयुनी आशा गायकवाड, माजी अध्यक्षा आयुनी किरण अहिरे, जयंती उत्सव मंडळाच्या सेक्रेटरी आयुनी. सुप्रिया शिंदे, उपसेक्रेकरी आयुनी. अश्विनी शिंदे, खजिनदार आयुनी.




लिलावती शिर्के व सर्वच महिलांनी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी रिपब्लिकन सेना मुंबई उपाध्यक्ष, समाजसेवक, उद्योजक, भावी नगरसेवक आयु. आशिष (बंटी) बाफना यांनी सांगितले की मी जरी दुसऱ्या धर्माचा असलो तरी मी आपल्यामध्येच असतो आणि हाच माझा परिवार आहे, आणि म्हणून मी माझ्या परीने या समाजातील गरजूंना सर्वोतोपरी मदत करण्याची ग्वाही दिली व कार्यक्रमाला भोजन दान केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक बौद्धजन पंचायत समिती गट क्रं. १४ चे गट प्रतिनिधी आयु. संदेश खैरे, वंबआ चे नेते व बौ.पं.स. शा. क्र. ११० चे अध्यक्ष आयु. सुनील जाधव, बौ.पं.स.शा.क्र.११३ चे उपाध्यक्ष आयु. ऍड. दिपक मोरे, बौ.पं.स.शा.क्र.८१६ चे अध्यक्ष आयु. राजेंद्र कांबळे, बौ.पं.स. १११ चे चिटणीस आयु. सुशील जाधव, बौ.पं.स. १०४ चे खजिनदार आयु. संगम ताम्हाणेकर, वंबआ चे निरीक्षक आयु. अरुण वाघमारे, भारतीय बौद्ध महासभा चे कार्याध्यक्ष आयु. मधुकर रुके, अध्यक्ष आयु. सिद्धार्थ सकपाळ, आयु. टपाल. बौ.पं.स.शा.क्र. ५७९ चे माजी चिटणीस आयु. प्रमोद जाधव, माजी उपचिटणीस शशिकांत नागावकर यांनी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला शाखेतील महिला/ पुरुष सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिटणीस आयु. सुदिप अहिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल अहिरे, जयवंत तांबे, सुदिप अहिरे, निलेश साळवी, रोहित तांबे, दिपेश माने, दामिनी तांबे, किरण अहिरे, ज्योती तांबे, अविका तांबे यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाला आरती प्रतीष्ठान दामिनी तांबे, अरुण वाघमारे यांच्या वतीने समोसे दान, सचिन कांबळे यांच्या वतीने लाडू दान, अतुल शिर्के यांच्या वतीने पाणी दान, बंटी बाफना यांच्या वतीने भोजन दान, बनसोडे मामा यांच्या वतीने साऊंड, सुदिप अहिरे, मनोज जाधव यांनी लायटिंग तसेच सर्व मान्यवर, शाखेचे सर्व सन्मा. आजी–माजी पदाधिकारी, सभासद आणि महिला मंडळ यांचे आभार व्यक्त करुन महिलांनी गरबा नृत्यावर ठेका धरून (नाचून) कार्यक्रम संपन्न केला.

# गंगामाऊली शुगर मार्फत ऊस पिक परिसंवाद संपन्न

केज/प्रतिनिधी गंगामाऊली शुगर या कारखान्या मार्फत कारखाना परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पुर्वहंगामी ऊस लागवड पद्धतीमुळे ऊस उत्पादनात होणारी वाढ या बाबत माहिती देण्याकरीता कृषिभुषन सन्मानित श्री.पाडुरंग (आबा) आवाड रा. आवाडशिरपुरा यांचे पुर्व हंगामी व सुधारीत ऊस जातींची लागवड पर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्र कार्यक्रमात श्री.पांडुरंग (आबा) आवाड यांनी शेतकऱ्यांना पुर्व हंगामी ऊस लागवडी करीता जमीनीची पुर्व मशागत, लागवड हंगाम, सुधारीत ऊस जाती, सरीतील अंतर, खत व्यवस्थापन, एकात्मीक रोग व किड व्यवस्थापन या बाबत सखोल मार्गदर्शन केले. या चर्चासत्रास मस्साजोग, सांगवी सारणी, पिंपळगव्हाण, शिंदी, काळेगाव, आरणगाव, जाधव जवळा, कोरेगाव, सावंतवाडी, डोनगाव, सारणी आनंदगाव, सोनीजवळा, चिंचोली माळी, हादगाव, डोका व कारखाना परिसरातील शेतकऱ्यांनी मोठया संख्येने सहभाग नोंदवला. या चर्चासत्रास गंगामाऊली शुगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बी.आय. मुजावर, मुख्य शेतकी अधिकारी श्री.अविनाश आदनाक, ऊस विकास अधिकारी, ऊस पुरवठा अधिकारी व शेतकी विभागातील सर्व कर्मचारी या उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.वसंत गायकवाड व प्रास्तावीक मुख्य शेतकी अधिकारी श्री.अविनाश आदनाक यांनी केले. या मध्ये त्यांनी प्रमुख मार्गदर्शक पांडुरंग (आबा) आवाड यांची ओळख व त्यांनी केलेले ऊस शेतीतील सुधारीत प्रयोग या बाबत सखोल माहिती दिली.

# ३ बहिणी, ग्रेजुएट अन् लग्न, कशी बनली चैतन्यानंद बाबाची खास आणि मग...लेडी ब्रिगेडचा मोठा खुलासा

बाबा चैतन्यनंदाच्या लेडी ब्रिगेडबद्दल दिल्ली पोलिसांनी एक मोठे रहस्य उलगडले आहे. या तिघी बहिणींनी बाबाच्या अगदी जवळच्या मानला जातात. पोलिसांनी या तीन बहिणींना अटक केली असून चौकशी दरम्यान त्यांनी धक्कादायक खुलासे केले आहेत.

त्या तिघी बहिणींची नावं श्वेता, भावना आणि काजल अशी असून त्या मूळच्या पश्चिम बिहार, दिल्ली इथल्या आहेत.

तुम्ही बाबांशी कसे जोडले गेलात?

या तिघीमधील एका बहीण असलेली श्वेताचा पहिल्यांदा बाबाशी संबंध २०११ मध्ये आला.नंतर तिने तिच्या दोन्ही बहिणी भावना आणि काजल यांची बाबाशी ओळख करून दिली. त्यानंतर बाबा चैतन्यनंदन तिघांनाही नोकरी दिली.




तिन्ही बहिणी पदवीधर होत्या आणि त्यांची लग्नही झाली आहेत.बाबांनी त्यांना त्यांच्या पात्रतेनुसार ६०,००० ते ८०,००० रुपयांपर्यंतचा मोठा पगार दिला. हळूहळू, त्या बाबाच्या सर्वात विश्वासू बनल्या. त्यांची संपत्ती आणि दर्जा पाहता, त्या बाबाना प्रत्येक गोष्टीत साथ देताना पाहिला मिळत होत्या.

बाबाशी अश्लील गप्पा आणि परदेश दौरे...

पोलीस तपासात अनेक गोष्टींचा खुलासा झाला, बाबा चैतन्यनंद तिन्ही बहिणींसोबत लैंगिकदृष्ट्या स्पष्ट संभाषण करत होता. शिवाय, या महिलांनी बाबासोबत अनेक परदेश दौरेदेखील केले आहेत. अलिकडेच, जेव्हा बाबा युएईला गेले होते तेव्हा त्यापैकी एक बहीण त्यांच्यासोबत होती. बाबा आतापर्यंत सुमारे १०० देशांना भेटी दिली असल्याची माहिती समोर आली आहे.

विद्यार्थिनींना धमकावणे आणि पुरावे नष्ट करणे...

तिन्ही बहिणींचे उपक्रम केवळ योगा वर्गांपुरते मर्यादित नव्हते. बाबाच्या सांगण्यावरून, त्यांनी विद्यार्थ्यांना धमकावले, त्यांच्या चॅट्स डिलीट केल्या, पुरावे नष्ट केले आणि मुलींना बाबांच्या आज्ञा पाळण्यास भाग पाडले, असं समोर आलं आहे. योगासनांचे फोटो त्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर पोस्ट केले गेले आणि बाबांनी स्वतः त्यांच्यावर अश्लील कमेंट केल्या.

कोविडच्या आधी, मुले आणि मुली दोघेही बाबाच्या संस्थेत जात असत. पण कोविडनंतर बाबानी फक्त मुलींनाच प्रवेश देण्यास सुरुवात केली. यामुळे या तिन्ही बहिणींचा दर्जा आणखी उंचावला. तर तपासादरम्यान, पोलिसांना बाबाच्या खोलीत एका बहिणीचे अश्लील फोटोही सापडले. तिन्ही बहिणींनी पोलिसांना कबूल केले की, बाबाने अनेक मुलींचा विनयभंग केला होता. शेवटी,दिल्ली पोलिसांनी अटक केलेल्या तिन्ही बहिणी बाबाच्या सर्वात खास टीमचा भाग होत्या. या बहिणी बाबाच्या केवळ विश्वासपात्र नव्हत्या तर होत्याच, तर त्यांनी त्याचे काळे कृत्य लपवण्यासही मदत केल्याच समोर आलं आहे.

१: लेडी ब्रिगेड म्हणजे काय आणि दिल्ली पोलिसांनी काय उघड केले?

उत्तर: लेडी ब्रिगेड ही बाबा चैतन्यनंदाची जवळची तीन बहिणींची टीम होती, ज्या त्याच्या विश्वासू होत्या. दिल्ली पोलिसांनी त्यांना अटक करून चौकशी केली, ज्यात बाबाच्या काळ्या कृत्यांचे धक्कादायक रहस्य उघड झाले. या बहिणींनी बाबाच्या गुन्ह्यांना आडवे लावण्यात मदत केली.

२: तिघी बहिणी कोण होत्या?

उत्तर: तिघी बहिणींची नावे श्वेता, भावना आणि काजल अशी आहेत. त्या मूळच्या पश्चिम बिहारच्या असून दिल्लीत राहतात. त्या पदवीधर आहेत आणि लग्न झालेले आहेत.

३: तिघी बहिणी बाबाशी कशाप्रकारे जोडल्या गेल्या?

उत्तर: श्वेताचा बाबाशी २०११ मध्ये पहिला संबंध आला. तिने नंतर आपल्या दोन बहिणी भावना आणि काजल यांची बाबाशी ओळख करून दिली. त्यानंतर बाबांनी तिघींना नोकऱ्या दिल्या आणि त्या त्याच्या अगदी जवळच्या झाल्या.

# लाचप्रकरणानंतर ठाणे महापालिका उपायुक्त शंकर पाटोळे निलंबित, अतिक्रमण विभागाचा पदभार उमेश बिरारींकडे

ठाणे : एका बांधकाम व्यावसायिकाकडून लाच घेतल्याप्रकरणी ठाणे महापालिकेचे उपायुक्त शंकर पाटोळे यांच्यासह दोन जणांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. या कारवाईनंतर ठाणे महापालिकेच्या कारभाराव टिका होत असतानाच, आयुक्त सौरभ राव यांनी शनिवारी शंकर पाटोळे यांना सेवेतून निलंबित केले. त्यांच्याकडील अतिक्रमण विभागाचा पदभार उपायुक्त उमेश बिरारी यांच्याकडे देण्यात आला आहे.

ठाणे महापालिका अतिक्रमण नियंत्रण विभागाचे उपायुक्त शंकर पाटोळे यांना मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने अटक केली होती. पालिकेच्या वर्धापन दिनीच ही कारवाई झाली होती. जागेवरील अतिक्रमण हटविण्यासाठी मुंबईतील एका बांधकाम व्यवसायिकाकडून त्यांनी ५० लाख रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले होते. त्यापैकी २५ लाख रुपयांचा पहिला हप्ता घेताना पाटोळे आणि त्यांचा सहकारी ओमकार गायकर यांना पथकाने पकडले होते. याप्रकरणी उपायुक्त शंकर पाटोळे, महापालिकेत डेटा ऑपरेटर पदावर काम करणारा ओमकार गायकर आणि सुशांत सुर्वे या तिघांविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. यानंतर सुशांत यालाही अटक करण्यात आली होती. या कारवाईनंतर पालिकेच्या कारभारावर सर्वत्र टिका होत होती.



लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईची गंभीर दखल घेऊन शंकर पाटोळे यांना २ ऑक्टोबरपासून महापालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. त्याबद्दलचा आदेश शनिवार, ४ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी जारी केला आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ च्या अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी उपायुक्त शंकर पाटोळे यांना निलंबित केले आहे. पाटोळे यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाईही सुरू करण्यात आलेली आहे.

उमेश बिरारींकडे अतिक्रमण विभागाची सुत्रे

ठाणे महापालिकेचे उपायुक्त उमेश बिरारी यांच्याकडे सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव विभाग, निवडणुक विभाग, माहिती व जनसंपर्क विभागाची जबाबदारी आहे. या विभागांसह आता अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाची जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आली आहेत. तर, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे यांच्याकडे सामान्य प्रशासन विभाग, मालमत्ता कर विभाग, आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि क्लस्टर सेलची जबाबदारी आहे. त्यांच्याकडील क्लस्टर सेलचा विभाग काढून तो उपायुक्त दीपक झिंजाड यांच्याकडे देण्यात आला आहे. याशिवाय, पाटोळे यांच्याकडे असलेला परिमंडळ २ चा कार्यभारही देण्यात आला आहे.

# मनपा आयुक्तांकडून विविध ठिकाणी पाहणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, स्विमिंग पूल व आर्वी गायरानाला भेट

लातूर/ प्रतिनिधी: मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरात विविध ठिकाणी भेटी देऊन सुरू असलेले कामांची व नवीन योजनांची पाहणी केली. नागरिकांच्या सूचना ऐकून घेतल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, हुतात्मा स्मारक व स्विमिंग पूलची पाहणी करून आर्वी गायरान येथील स्मशानभूमी परिसर व नाल्या संदर्भातील तक्रारीही ऐकून घेतल्या.

श्रीमती मानसी यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पाहणी केली. हे उद्यान अधिक चांगल्या पद्धतीने विकसित करावे. उद्यानात लॉन विकसित करून लहान मुलांसाठी खेळणी तसेच वृद्धांना बसण्यासाठी बाकडे व कट्टे तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. हुतात्मा स्मारक येथेही आयुक्तांनी भेट दिली. परिसर विकसित करून येथेही वृद्धांसाठी बैठक व्यवस्था तयार करावी, असे निर्देश त्यांनी दिले. हुतात्मा स्मारकाच्या बाजूसच मनपाचा स्विमिंग पूल आहे.गेल्या अनेक वर्षांपासून बंद असणारा हा स्विमिंग पूल विकसित करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.





आर्वी गायरान येथील नागरिकांच्या काही तक्रारी होत्या, त्या अनुषंगाने आयुक्त श्रीमती मानसी यांनी तेथेही भेट दिली. स्मशानभूमी संदर्भातील तक्रारी ऐकून घेतल्या. या स्मशानभूमीच्या विकासासाठी प्रस्ताव देण्यात आलेला असल्याचे आयुक्तांनी नागरिकांना सांगितले. आर्वी परिसरातून एक मोठा नाला वाहतो. हा नाला ओलांडण्यासाठी असणारा पूल कमी उंचीचा आहे. या ठिकाणी नवा पूल बांधण्याचीही मागणी नागरिकांनी केली. या पुलासाठीही प्रस्ताव दाखल केलेला असल्याचे आयुक्त श्रीमती मानसी यांनी नागरिकांना सांगितले.

आयुक्तांसमवेत उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, शहर अभियंता उषा काकडे, मुख्य स्वच्छता निरीक्षक कलीम शेख, ,उद्यान विभाग प्रमुख समाधान सुर्यवंशी यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# हम सब एक है,भारतीय संविधानाचा विजय असो सद्भावना मंचाच्या सामाजिक एकता प्रदर्शनात निनादला नारा

लातूर :- हम सब एक है,भारतीय संविधानाचा विजय असो,आदी जोरदार नारे देत, आय लव्ह भारतीय संविधान, आय लव्ह बुध्दा,आय लव्ह,महादेव,आय लव्ह जिजस,आय लव्ह मोहंमद आदींचे असंख्य फलक उंचावत सद्भावना मंच लातूरने शहरात सामाजिक सौहार्द,सलोखा,शांती अबाधित ठेवण्यासाठी आणि देशभरात एकतेचा संदेश देण्यासाठी लातूरच्या गांधी चौकात आज शनिवार,दि.४ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या सर्वधर्मिय प्रतिनिधींच्या सामाजिक एकता प्रदर्शनात शेकडो राष्ट्रप्रेमींनी सत्ताधारी सरकार आणि आरएसएसच्या जाती जातीत भांडणे लावण्याचा डाव आम्ही उधळून लावू असा इशाराच दिला.





याप्रसंगी प्रा.सुभाष भिंगे,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवाजी शिंदे,शिवसेना नेते पप्पू कुलकर्णी,ॲड. ला.रा.शेख,प्राचार्या शहेजादी शेख, ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, अङ्गजल कुरेशी,माजी उपनगराध्यक्ष मोईजभाई शेख, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने,डॉ. प्रभुदास दुप्ते,ङ्गादर सुभान रकटे,सुफी समशोद्दीन सय्यद आदिंनी केंद्र,राज्य शासन आणि रास्व संघाने देशात काहीतरी निमित्त करुन अशांतता,भाईचारा उध्वस्त करण्याचे चालविलेले कारस्थान आम्ही सुजान भारतीय चालू देणार नाही,जशास तसे उत्तर दिले जाईल असा ईशारा यावेळी आपल्या मनोगातून दिला.

या सामाजिक एकता प्रदर्शनात डॉ. श्रीकांत गायकवाड,रामराजे आत्राम,नरसिंग घोडके,ॲड.राहुल मातोळकर, अक्षय चवळे, खंडू जगताप,दिकप आपरे, धनंजय भुरके, जल्ङ्गीकार पटेल, डॉ.अमजद पठाण, बशीर शेख, सिद्राम आयवळे, विष्णू जावीर, सचिन रसाळ,शाम कांबळे, सलीम सय्यद, मार्क्स उजगरे, सलीम शेख, दत्ता माने, संजय कुलकर्णी, प्रकाश वाघमारे,कॉ.विश्वंभर भोसले, श्रावण मस्के गुरुजी, बेंजामीन दुप्ते, डॅनियल वाघमारे, साबेरा पठाण, कमल शहापूरे,मीना टेंकाळे, शङ्गी शेख,सॅम्युअल सोनकांबळे,सम्युअल दुप्ते, महमंद युनूस पटेल, अजिज बागवान, असलम शेख, रामदास मोहिते, मधुसुदन जाधव, अजिज सिद्दीकी, प्रभाकर चौधरी, खदीर खान,बाळ होळीकर,ॲड.गोविंद सिरसाट,यांच्यासह अनेक देशप्रेमी नागरिक,महिला सहभागी झाल्या होत्या.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंती साजरी

छ. संभाजी नगर /प्रतिनिधी :- वसंतराव नाईक महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर येथे महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय शिंदे , पर्यवेक्षक श्री . विवेकानंद थोरमोटे व श्री प्रविण बोबडे यांचे स्वागत करण्यात आले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय शिंदे यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला,त्यानंतर संगीत विभागाचे प्रमुख प्रा.प्रविण बोबडे व त्यांच्या विद्यार्थ्यांनी गांधीजीचे भजन गायिले भजनानंतर सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी दहा मिनिटे मौनव्रत धारण केले व दोन्ही महापुरुषांना आदरांजली वाहिली, कार्यक्रम संयोजन समिती प्रमुख डॉ. कमलेश महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समितीच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.



# सदाशिवराव पाटील यांच्याकडे जबाबदारी दिल्यास भाजपचे शंभर टक्के यश

देवणी /गिरीधर गायकवाड :- बँकिंग क्षेत्रातून सेवानिवृत्त झाल्यानंतर भारतीय जनता पक्षात दमदार एन्ट्री करून अतिशय परिश्रमातून तळेगावचे सरपंच ते देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असा राजकीय प्रवास सदाशिवराव रामचंद्रराव पाटील तळेगावकर यांनी चालू केला आहे भारतीय जनता पक्ष माझा व मी भारतीय जनता पक्षाचा ही भूमिका घेऊन भारतीय पक्षाने दिलेले कार्यक्रम अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने राबविले जात आहेत कोणती निवडणूक असो वा नसो पक्षाचे ध्येय धोरण उद्दिष्टे सर्वसामान्य ग्रामीण भागातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य सातत्याने करीत आहेत त्यामुळे त्यांचा संपर्क मोठ्या प्रमाणात वाढला आहेत नुकतीच राजकारणात आलेली कोरीपाटी असल्यामुळे राजकीय कसलेचं खाच खळगे न ठेवता सरळ निश्वार्थ राजकारणी म्हणून सदाशिवराव पाटील यांच्याकडे पाहिलं जात तर सर्वच पक्षाचे कार्यकर्ते सदाशिवराव पाटील तळेगावकर यांना आदरयुक्त भावनेने पाहतात त्यामुळे देवणी तालुक्यातील सर्वच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीची जबाबदारी पक्ष श्रेष्ठिने सदाशिवराव पाटील यांच्यावर दिली तर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकित शंभर टक्के यश मिळेल असे मत ग्रामीण भागातील सर्वसामान्य मतदार व्यक्त करीत आहे जे काही नवं ते देवणीला हवं म्हणून लोकप्रतिनिधीच्या माध्यमातून विकासाची कास धरून प्रशासनाच्या योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत कश्या पद्धतीने पोहचविता येईल जीवाचं रांन करणारा लोकप्रिय लोकनेता म्हणून सदाशिवराव पाटील तळेगावकर यांच्याकडे एक आशेचा किरण म्हणून पाहिले जाते देवणी तालुक्यातील बऱ्याच ग्रामपंचायती आहात त्यात काँग्रेस पक्षाच्या आहेत तरी सर्वच ग्रामपंचायत लोकप्रतिनिधी यांनी सदाशिवराव पाटील यांना देवणी तालुका सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड केली आहे ही निवड म्हणजे लोकांभिमुख नेत्रत्वाचा बहुमानचं म्हणावा लागेल सदाशिवराव पाटील यांची देवणी कृउबा समितीचे सभापती म्हणून निवड झाल्यापासून कृ उ बाजार समितीचा चेहरा मोहरा बदलण्याचा चंग बांधला आहे दिड कोटी रुपये शेतकरी भवन लाखो रुपयेचे नियोजित गाळे देवणीच्या सौंदर्यात भर टाकणारे आहे शेतकऱ्याच्या अडचणी समजावून घेऊन सातत्याने सोडविण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत त्यामुळे कर्नाटक महाराष्ट्र राज्यातील व्यापारी आपला शेती माल देवणी कृ उ बाजार समितीत घेऊन येत आहेत काही लोकप्रतिनिधी केवळ निवडणुक काळात सक्रिय होतं असतात मात्र सदाशिवराव पाटील तळेगावकर आपल्या कार्यात मग्न असतात त्यामुळे देवणी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे नियोजन जबाबदारी पाटील यांना दिली तर यश शंभर टक्के मिळेल यात शंका नाही



# अतिवृष्टीग्रस्त भागातील शेतमजुरांनाही शासनाने आर्थिक मदत करावी...

## युवा भिम सेनेची मागणी

निलंगा / प्रतिनिधी :- मागील काळात महाराष्ट्रात अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान झाल्यामुळे शेती कामावर शेतमजूर म्हणून काम करणाऱ्या शेतमजुरांवर ही आता उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्या सोबतच शेतमजुरांनाही सरकारने दिवाळीपूर्वी प्रत्येक परिवारास दहा हजार रुपयाची आर्थिक मदत करावी अशी मागणी युवा भीमसेनेचे तालुका अध्यक्ष धनराज कांबळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, मे २०२५ पासून आजतागायत सतत चालू असलेल्या पावसामुळे शेतमजुरांच्या हाताला काम नाही त्यामुळे शेतमजूर घरी बसून हलाखीचे जीवन जगत आहे. पावसामुळे शेतमजुरावर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांसोबत शेतमजुरांनाही तात्काळ दहा हजार रुपयाची आर्थिक मदत करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर युवा भीमसेनेचे तालुकाध्यक्ष धनराज कांबळे (अंबुलगेकर) यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# तीसरा नॉर्थईस्ट इंडिया इंटरनेशनल फिल्म फेस्टिवल (NIIFF) 2025) मुंबईत संपन्न , संस्कृती आणि चित्रपट का भव्य उत्सव

मुंबई / के रवि दादा :- मुंबईत तीसरा संस्करण नॉर्थईस्ट इंडिया इंटरनेशनल फिल्म फेस्टिवल (NIIFF) २०२५, जी Find Studioz चाप पाफलाने मुंबई जुहू मेयर हॉल, मध्ये शानदार पद्धतीने संपन्न झाला भारत आणि विदेशातून आलेल्या दर्शकांनी जास्त संखेने भाग घेतलाव आणि नॉर्थईस्ट इंडियाची सांस्कृतिक समृद्धी आणि चित्रपटातिल उत्कृष्ट चा आनंद घेतला. संध्या चा आरंभ प्रसिद्ध गायक जुबिन गर्ग ला श्रद्धांजलि देच केलि , नंतर एन.के. नागा करवी एक मधुर प्रस्तुती केली जै नागालँड चै पुरस्कार विजेता कलाकार आणि उस्ताद बिस्मिल्ला खान युव पुरस्कार प्राप्तकर्ता आहे





सदर कार्यक्रम ची मेजवानी मोहन दास (अध्यक्ष - NIIFF), अनुराग त्रिपाठी (CnmÜ¶j - NIIFF) आणि शिराज़ हेनरी (सह-संस्थापक - NIIFF) ने कैली याफेस्टिवलमध्येप्रमुख विशेषव्यक्तीआणि सेलिब्रिटी चेहरेउपस्थितहोते:

सुनिल जोड़े , अध्यक्ष - ICC--; कृष्ण पिंपले, मान्यवर कांसिल ऑफ़ तंज़ानिया, चेन्नई (मुख्य अतिथि); अतुल कुलकर्णी, अध्यक्ष - नमस्ते फाउंडेशन, गुवाहाटी; सुरेश थॉमस (क्रेसेंडो संगित ); ज्येष्ठ अभिनेता राजेंद्र गुप्ता; शिराज़ हेनरी, सह-संस्थापक - NIIFF; आणि मोहन दास, अध्यक्ष - NIIFF. वगैरे उपस्थितीत हीते इतर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रसिद्ध बॉलीवुड गायक श् जनाब मोहम्मद सलामत; अकशदीत्या लामा; श्रीमती सोमा राठौड़; जे. ब्रैंडन हिल (अभिनेता); श्रीमती कैफीना खान (निर्माता आणि सेवा); डॉ. मृणाल इनामदार; हीताल पुनीवाला (प्रसिद्ध अभिनेता); श्रीमती सुजाता मेहता (प्रसिद्ध अभिनेत्री ); ललित परिमू; पिया रॉय (ग्लॅम वर्ल्ड मिस इंडिया); कमल घिमिरे (अभिनेता); श्रीमती वू (प्रसिद्ध यॉग आर्टिस्ट); वेंकट रमेश (अभिनेता); डॉ. (ऑन) अनुशा श्रीनिवासन अय्यर; अकरम खान (वरिष्ठ ऊज.झ.); आणि अबुजार रिज़वी (संगीत निर्देशक) देखिल सामिल होते

या वर्षाच्या आवृत्तीमध्ये महिला फिल्म निर्मात्री वर वविशेष लक्ष्य देन्यात आले तसेच त्यांना सन्मानित करण्यात आले आणि क्षेत्रामध्ये उभरते प्रतिभांना प्रोत्साहन देण्यात आले आहे.

नॉर्थईस्ट इंडियाचा प्रमुख पुरस्कार विजेता

सर्वोत्तम फीचर फिल्म: तारिख - हिमज्योति तालुकदार

दुसरी बेस्ट फीचर फिल्म: कैनखोल (माझे कुटुंब) - सिंगपीयर्सन अनाल

सर्वोत्तम फीचर फिल्म (जूरी पुरस्कार): आदि - दिबाकर पेगू

सर्वश्रेष्ठ निर्देशक: हौशी amateurs - धीरज कश्यप

सर्वोत्तम डेब्यू निर्देशक: ओथरेई - सेव्ह माय सोल - दिनेश नौरम सौरोकहाइबम

सर्वश्रेष्ठ अभिनेता: बोलोराम दास (तारीख)

सर्वोत्कृष्ट: अनिंदिता रुद्राज (झंकार - द मेलडी ऑफ रेझोनन्स)

सर्वोत्तम महिला फिल्म निर्माता: द क्राय ऑफ अ लाइफलेस - भवानी डोले ताहू

ह्या शिवाय, लघुपट, डॉक्यूमेंट्री, एक्सपेरिमेंटल चित्रपट आणि ज्यूरी पुरस्कार इतर पात्रांमध्ये देखील पुरस्कार दिले आहेत, जे नॉर्थईस्ट इंडियाची प्रतिभा आणि विलक्षण वर्णने आहेत.

पुरस्कार समारोह CSIB J«wn, ICC--, EON Films, 91 Coin Foundation, जीरपसश City Saoji Management Services Pvt. लिमिटेड (श् नितिन ढांकुले आणि श्कौस्तुभपटकोटवार), अवतार क्रीडा पोषण, मनोज कुमार तिवारी, व्हीएनआर इन्व्हेस्टमेंट (प्रतिनिधि: श्रीमती वीणा एन. राजाध्यक्ष), सँटेक एंटरटेनमेंट, क्रेसेंडो म्युझिक, कंटेंट किंग्स, आणि श् निनसांग जमिर (नागालँड) च्या सहयोगा ने यशस्वी केला

फेस्टिवल ची संस्थापक रेबेका चांगकिजा सेमा ने एनआयआयएफएफ के एन ला मुख्य या कि नॉर्थईस्ट इंडिया आणि ग्लोबल फिल्म उद्योगा मध्ये पुलाचे काम केले आहे सह-संस्थापक शिराज़ हेनरी ने प्रतिभावान, भागीदार आणि शुभचिंतकांना धन्यवाद दिले की, आपन सर्वानि मिलुन हया चित्रपटाच्या दृष्टिकोनाला मजबूत केले त्या मुळे या आवृत्तीला एक उत्कृष्ट यश मिळेल.

तीसरा एनआयआयएफएफ व्यापक रूपाने एक सांस्कृतिक सकारात्मक हब मानला गेला-ज़्यात कलात्मक उत्कृष्टता चे जश्न साजरे केले गेले तसेच विविध आवाजांची ही प्रशंसा केली गेली आणि नॉर्थईस्ट इंडियाच्या जागतिक मंचावर सादर करण्यात आले.

# भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड



केज/प्रतिनिधी भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड झाल्याबद्दल मित्रपरिवाराच्यावतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या केज शहराध्यक्षपदी अक्षय हजारे यांची निवड झाल्याची बातमी मित्र परिवाराला कळताच मित्र परिवाराच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे भरून आनंद उत्सव साजरा केला. सतकाराला उत्तर देताना नवनिर्वाचित शहराध्यक्ष अक्षय हजारे म्हणाले की, भविष्यामध्ये भ्रष्टाचार विरोधी लढ्यामध्ये जास्तीत जास्त लोकांना सामील करून संघटनेची ताकद वाढवून गोरगरीबावर होणारे अन्याय आणि शासकीय कार्यालयात झालेला भ्रष्टाचार हा निपक्षपातीपणाने उघडकीस आणून भ्रष्टाचाराला आळा घालण्याचे प्रामाणिकपणे काम करून शोषित,वंचित, पीडित व बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम करील असा विश्वास मित्र परिवाराला सत्काराच्या कार्यक्रमात बोलताना अक्षय हजारे यांनी दिला आहे. यावेळी लखन हजारे, धीरज मस्के, प्रतीक मस्के, हर्षद मस्के, मनोज मस्के, प्रदीप हजारे, सुमित मस्के, सुरज मस्के, शुभम आरकडे, पप्पू वाघमारे, पियुष जानवे यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होते. निवडीबद्दल सर्व स्तरातुन अक्षय हजारे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE